**Two Days Workshop on**
**" Gender,Masculinity and Violence "**

**Date: 4-5 Feb 2015**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

द्वारा आयोजित

सम्यक संवाद व संसाधन केंद्र, पुणे यांच्या सहकार्याने
दोन दिवसीय कार्यशाळा दि. ४-५ फेब्रुवारी २०१५.

# विषय : लिंगभाव, पुरुषत्व आणि हिंसाचार

**[Gender, Masculinity & Violence]**

**'स्त्री ही जन्मत नाही तर ती घडविली जाते'.**

***-सिमॉन द बुवा***

स्त्रीत्वाच्या घडणीसंबंधीचा सिमॉन द बुवांचा उपरोक्त विचार आज सर्वमान्य झाला आहे. मुलगी म्हणून जन्मल्यानंतर, पुरुषप्रधान समाजामध्ये तिला बाईपणाच्या साच्यात घडविले जाते. तिच्या विचार, भावना, वर्तणूक, देहबोली आदींचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आदर्श आणि तसे निर्देश उभे केले जातात. स्त्री अभ्यासाने स्त्रीत्वाच्या पितृसत्ताक साच्याला छेदण्याचे महत्वपूर्ण प्रयत्न केलेले आहेत.

पुरुषप्रधानता स्त्रियांप्रमाणेच पुरुषांसाठीचेही साचे निर्माण करत असते. पुरुषांची शरीरयष्टी, भावनाव्यक्ती, देहबोली, पोषाख, पेहराव कशी असावी याची नियमावली गठीत करीत असते. म्हणून पुरुषत्व (Masculinity), लिंगभाव (Gender) आणि हिंसाचार (Violence) यांचे आकलन आणि विश्लेषण करणे तेवढेच गरजेचे ठरते.

लिंगभावनिरपेक्ष (Gender Just) समाजनिर्मितीसाठी व्यक्तीवरील पितृसत्ताक स्त्रीत्व आणि पुरुषत्वाची पुटं गळून पडणं गरजेचं आहे. याच प्रयत्नाचाच एक भाग म्हणून वर्ग-जाती-पितृसत्ताक समाजात घडलेले आपले व्यक्तिमत्व समजून घेवून सर्वांगिन व्यक्तीमत्वाच्या घडणीस प्रतिबंधीत करणाऱ्या पैलूंना आपल्यातून काढून टाकण्यासाठी ***'लिंगभाव, पुरुषत्व आणि हिंसाचार'*** (*Gender Masculinity & Violence*) या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे दि. ४-५ फेब्रुवारी २०१५ रोजी ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे आयोजन करण्यात येत आहे.

---

**ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**E-mail: Director.wsc@bamu.net Ph.0240-2403331**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

**Tarabai Shinde Women's Studies**

Organize

**Two Days Workshop on**

# Gender, Masculinity & Violence

## ATTENDANCE REPORT

**Date : 04-02-2015**

| Sr.No. | Name of the Student | Course | Signature [Session One] | Signature [Session Two] |
|---|---|---|---|---|
| 1 | Bagul Sheetal Subhash | MA Second Year | [signature] | [signature] |
| 2 | Borkar Kiran Badshaha | MA Second Year | [signature] | [signature] |
| 3 | Gaikwad Archana Tukaram | MA Second Year | [signature] | [signature] |
| 4 | Gaikwad Monika Hiralal | MA Second Year | [signature] | |
| 5 | Ingle Raveendra Atmaram | MA Second Year | [signature] | [signature] |
| 6 | Kakde Rekha Laxman | MA Second Year | [signature] | [signature] |
| 7 | Salve Shobha Prabhakar | MA Second Year | [signature] | [signature] |
| 8 | Shejwal Sushila Asaram | MA Second Year | [signature] | [signature] |
| 9 | Tigote Chhaya Shivaji | MA First Year | [signature] | [signature] |
| 10 | Khandare Surekha Dattatraya | MA First Year | [signature] | [signature] |
| 11 | Malwatkar Manjusha Sharadkumar | MA First Year | [signature] | |
| 12 | Mahato Mohana Hiraman | MA First Year | [signature] | [signature] |
| 13 | Mule Vandana Babasaheb | MA First Year | [signature] | |
| 14 | Khambekar Arteeshymal Shyam | MA First Year | [signature] | [signature] |
| 15 | Khavane Mangal Wamanrao. | MA First Year | [signature] | [signature] |
| 16 | Ghule Shridevi Kalyanrao | MA First Year | [signature] | [signature] |
| 17 | Sonwane Vandana Kushba | MA First Year | [signature] | [signature] |
| 18 | Akhade Amruta Ramesh | MA First Year | [signature] | [signature] |
| 19 | Jawale Arati Deorao | MA First Year | [signature] | [signature] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20 | Mewad Mathura Phulsing | MA First Year | [signature] | |
| 21 | Wahane Poornima Supreshwar | MA First Year | [signature] | |
| 22 | Arak Ravikumar Tejrao | Certificate course | [signature] | [signature] |
| 23 | Bahirat Prerna Sopanrao | Certificate course | [signature] | [signature] |
| 24 | Bhise Padmini Limbaji | Certificate course | [signature] | [signature] |
| 25 | Bhojane Sonal Dadarao | Certificate course | [signature] | [signature] |
| 26 | Dayma Bhagyashree Bhikhulal | Certificate course | [signature] | [signature] |
| 27 | Durge Tejswnini Subhahs | Certificate course | [signature] | [signature] |
| 28 | Gaikwad Sheetal Bhagwan | Certificate course | [signature] | [signature] |
| 29 | Hanif Sameer Shaikh | Certificate course | [signature] | [signature] |
| 30 | Hiwale Jayshree Subhash | Certificate course | [signature] | [signature] |
| 31 | Jawale Shilpa Yashwanta | Certificate course | [signature] | [signature] |
| 32 | Joshi Amruta Ashok | Certificate course | [signature] | [signature] |
| 33 | Kale Meena Rajesh | Certificate course | [signature] | |
| 34 | Kamble Nikita Namdev | Certificate course | [signature] | [signature] |
| 35 | Kanise Anil Tuljaram | Certificate course | [signature] | [signature] |
| 36 | Kharat Monika Samuel | Certificate course | [signature] | [signature] |
| 37 | Markad Swati Jagannath | Certificate course | [signature] | [signature] |
| 38 | Mohod Sujata Anna | Certificate course | [signature] | [signature] |
| 39 | Naik Sarla Bhalchandra | Certificate course | [signature] | [signature] |
| 40 | Nandedkar Sugandha Chandrashekhar | Certificate course | [signature] | [signature] |
| 41 | Pagare Varsha Dilip | Certificate course | [signature] | [signature] |
| 42 | Phadke Madhumita Arjun | Certificate course | [signature] | [signature] |
| 43 | Rathod Sanjivani Janardhan | Certificate course | [signature] | [signature] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 44 | Salve Dipti | Certificate course | Dipti | Dipti |
| 45 | Sawarkar Sarita Shantaram | Certificate course | [signature] | |
| 46 | Shinde Jaishri Pralhad | Certificate course | Jayshri | Jayshri |
| 47 | Shah Saira Qamruddin | Certificate course | [signature] | [signature] |
| 48 | Shivbhakte Prakash Laxman | Certificate course | [signature] | [signature] |
| 49 | Tupe Payal Ramesh | Certificate course | TupeAR | TupeAR |
| 50 | Virshid Rajeshri Kaduba | Certificate course | [signature] | |
| 51 | Wahul Sandeep Ramesh | Certificate course | [signature] | [signature] |
| 52 | Wakankar Rameshwar Ashroba | Certificate course | | |
| 53 | Wakude Sushma Parmanand | Certificate course | [signature] 4/2 | |
| 54 | Mewad Mathura Fulsingh | M.A. I year | Mewad 4/2/2015 | Mewad |
| 55 | Bhalekar Ashwini Govind | Poli - sci | [signature] | |
| 56 | Maske Mandakini | Economics | Maske | Maske |
| 57 | BHOJANE SWATI HIMMAT | Commerce | Bhojane. | Bhojane. |
| 58 | Dhanedhar Manisha E. | Economics (PhD) | M.E. Dhanedhar | M.E. Dhanedhar |

59) Wavhle Nitin M.A. II [signature] [signature]

[signature]

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

नॅक समिती तर्फे अ दर्जा प्राप्त


| | | |
|---|---|---|
| कार्यालय | : | (०२४०) २४०३११४ ते १२१ |
| बीसीयुडी कार्यालय | : | (०२४०) २४०३२२३ |
| कुलसचिव कार्यालय | : | (०२४०) २४०३३३४ |
| फॅक्स (०२४०) | : | २४०३-२२४/३३५ |
| तारा | : | बामूसिटी |
| ई-मेल | : | bcud.office@bamu.ac.in |
| संकेत स्थळ | : | bamu. Net |

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद - ४३१ ००४.
(महाराष्ट्र)


संदर्भ. क्र.सांख्यिकी/५/२०१४-१५/3883-84

दिनांक:-१०/०२/२०१५

प्रति,
डॉ. चेतना प्र. सोनकांबळे,
संचालक,
ताराबाई शिंदे स्त्री अध्यासन केंद्र,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

विषय:- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निधीतून ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात 'लिंगभव, पुरूषत्व आणि हिंसाचार' या विषयावर कार्यशाळा आयोजित करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातर्फे ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रास 'लिंगभव, पुरूषत्व आणि हिंसाचार' या विषयावर सम्यक संवाद व संसाधन केंद्र, पुणे या संस्थेच्या सहकार्याने दि. ०४ व ०५ फेब्रुवारी, २०१५ रोजी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजनासाठी परवानगी देण्यात येत असुन आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी ताराबाई शिंदे अध्यासन केंद्रासाठी चर्चासत्रे, परिषदा, आयोजन, कार्यशाळा या लेखाशिर्षकांतर्गत रू. ४,००,०००/- च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन रू ३५,०००/- अनुदान मंजुर करण्यात येते आहे.

करिता सदरील निर्णय आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत.

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ

लोकप्रबोधन
सोमवार, दि.९ फेब्रुवारी २०१५



# सामाजिक सलोख्यासाठी लिंगभावात्मक दृष्टीकोन हवा

## स्त्री चळवळीचे अभ्यासक आनंद पवार यांचे प्रतिपादन



औरंगाबाद-प्रतिनिधी/८

समाजातील सलोखा कायम राखण्यासाठी तसेच देशाच्या प्रगतीसाठी स्त्री-पुरुष दोघांमध्ये लिंगभावात्मक दृष्टीकोन विकसित होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन स्त्री चळवळीचे अभ्यासक आनंद पवार यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे पुणे येथील सम्यक संवाद व संसाधन केंद्राच्या सहकार्याने 'लिंगभाव, पुरुषत्व आणि हिंसाचार' याविषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महात्मा फुले सभागृहात झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विलास खंदारे यांच्या हस्ते झाले.

केंद्राच्या संचालक डॉ. चेतना सोनकांबळे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी प्रतिमकुमार, प्रा. निर्मला जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत ५० संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी आनंद पवार म्हणाले, देशातील महिला हिंसाचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आता पुरुषांसोबत काम करण्याची व पुरुषत्वाची हिंसक संकल्पना बदलण्याची आवश्यकता आहे. स्त्री किंवा पुरुषांबद्दल समाज विशिष्ट प्रतिमा तयार करतो. स्त्रियांना सोशिक बनवण्यासाठी व पुरुषांना आक्रमक बनविण्यासाठी त्यांचे लिंगभाव आधारित समाजिकीकरण केले जाते. ही आक्रमकता महिलांवर वाढत्या हिंसाचाराचे मूळ कारण आहे.

पितृसत्ताक समाजात स्त्रिला नियंत्रीत करण्यासाठी हिंसेचे हत्यार वापरले जाते. पुरुषत्व या संकल्पनेते समाजशास्त्रीय, आर्थिक व राजकीय विश्लेषण करुन त्याचा एकूणच हिंसाचाराशी व विशेषत: स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराशी कसा संबंध आहे याची कार्यशाळेत प्रामुख्याने चर्चा झाली.

स्त्री अध्ययनाला अलिकडील काळात मोठे महत्त्व प्राप्त झाले असून, स्त्री अत्याचाराचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक, मानसशास्त्रीय या सर्व अंगाने अभ्यास होणे गरजेचे आहे, असे डॉ. विलास खंदारे म्हणाले तर केवळ सिद्धांत वाचून समाजात परिवर्तन होत नसते,प्रत्यक्षात कृतीची गरज आहे, असे डॉ. चेतना सोनकांबळे म्हणाल्या. डॉ. सविता बहिरट यांनी सूत्रसंचालन केले तर आभार मंजूश्री लांडगे यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी ललित भवरे, अश्विनी मोरे, किशोर उघडे, श्यामसुंदर कंटुले, विकास टावले, संतोष लोखंडे, संजय पोळ आदींनी परिश्रम घेतले.

दै. लोकप्रबोधन
दि. 9/02/2015

औरंगाबाद • सोमवार, ९ फेब्रुवारी २०१५

# लिंगभावात्मक दृष्टिकोन हवा

## स्त्री अभ्यास केंद्राच्या कार्यशाळेत स्त्री चळवळीचे अभ्यासक आनंद पवार यांचे मत

प्रतिनिधी | औरंगाबाद

समाजात सलोखा ठेवण्यासाठी तथा देशाच्या प्रगतीसाठी स्त्री-पुरुषांमध्ये लिंगभावात्मक दृष्टिकोन विकसित करण्याची गरज आहे, असे मत स्त्री चळवळीचे अभ्यासक आनंद पवार यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने महात्मा फुले सभागृहात 'लिंगभाव, पुरुषत्व आणि हिंसाचार' या विषयावर कार्यशाळा झाली त्या वेळी ते बोलत होते.

सामाजिकशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विलास खंदारे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. डॉ. पवार म्हणाले, स्त्री किंवा पुरुषांबद्दल समाज विशिष्ट प्रतिमा तयार करत असतो. स्त्रियांना शोषित आणि पुरुषांना आक्रमक बनवण्यासाठी त्यांचे लिंगभावाधारित सामाजिकीकरण केले जाते. ही आक्रमकता महिलांवर वाढत्या हिंसाचाराचे मूळ कारण ठरते आहे. पितृसत्ताक समाजात स्त्रीला नियंत्रित करण्यासाठी



मार्गदर्शन करताना डॉ. आनंद पवार, डावीकडून डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. विलास खंदारे.

हिंसाचाराचा आधार घेतला जातो. पुरुषत्व या संकल्पनेचे समाजशास्त्रीय, आर्थिक व राजकीय विश्लेषण करून त्याचा एकूण हिंसाचाराशी व विशेषतः स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाशी कसा संबंध आहे याची कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. खंदारे म्हणाले, स्त्री अध्ययनाला अलीकडील काळात मोठे महत्त्व प्राप्त झाले असून स्त्री अत्याचाराचा सामाजिक, आर्थिक राजकीय, कौटुंबिक, मानसशास्त्रीय या सर्व अंगाने अभ्यास होणे गरजेचे गरजेचे आहे.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. चेतना सोनकांबळे म्हणाल्या, केवळ सिद्धांत वाचून समाजात परिवर्तन होत नाही, तर त्याला प्रत्यक्षात कृतीची जोड द्यावी लागते. प्रीतमकुमार, निर्मला जाधव आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. डॉ. सविता बहिरट यांनी सूत्रसंचालन केले, तर मंजुश्री लांडगे यांनी आभार मानले. ललित भवरे, अश्विनी मोरे, किशोर उघडे, श्यामसुंदर कंटुले, विकास टाचले, संतोष लोखंडे, संजय पोळ आदींनी परिश्रम घेतले.

दै. दिव्यमराठी
9/02/2015

# सलोख्यासाठी लिंगभावात्मक दृष्टिकोन हवा



संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी)- समाजातील सलोखा कायम राखण्यासाठी तसेच देशाच्या प्रगतीसाठी स्त्री-पुरुष दोघांमध्ये लिंगभावात्मक दृष्टिकोन विकसित होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन स्त्री चळवळीचे अभ्यासक आनंद पवार यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे पुणे येथील सम्यक संवाद व संसाधन केंद्राच्या सहकार्याने बुधवारी 'लिंगभाव, पुरुषत्व आणि हिंसाचार' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महात्मा फुले सभागृहात झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिकशास्त्र विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. विलास खंदारे यांच्या हस्ते झाले. केंद्राच्या संचालक डॉ. चेतना सोनकांबळे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी प्रीतमकुमार, प्रा. निर्मला जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत ५० संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी आनंद पवार म्हणाले, देशातील महिला हिंसाचाराच्या वाढत्या घटनांच्या

## आनंद पवार यांचे प्रतिपादन

पार्श्वभूमीवर आता पुरुषांसोबत काम करण्याची व पुरुषत्वाची हिंसक संकल्पना बदलण्याची आवश्यकता आहे. स्त्री किंवा पुरुषांबद्दल समाजात विशिष्ट प्रतिमा तयार करते. स्त्रियांना सोशिक बनवण्यासाठी व पुरुषांना आक्रमक बनविण्यासाठी त्यांचे लिंगभाव आधारित सामाजिकीकरण केले जाते. ही आक्रमकता महिलांवर वाढत्या हिंसाचाराचे मूळ कारण आहे. पितृसत्ताक समाजात स्त्रीला नियंत्रित करण्यासाठी हिंसेचे हत्यार वापरले जाते. डॉ. सविता बहिरट यांनी सूत्रसंचालन केले, तर मंजुश्री लांडगे यांनी आभार मानले. कार्यशाळेत ललित भवरे, अश्विनी मोरे, किशोर उघडे, शामसुंदर केरले, विकास टाचले, संतोष लोखंडे, संजय पोळ आदींनी परिश्रम घेतले.

दै. सामना दि. 05/02/2015

Workshop on Gender, Masculinity & Violence [4-5/2/2014]







